# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-10.04.2026 वार- शुक्रवार**

---

**मांडवीय**

निरोगी भारत, समृद्ध भारत आणि विकसित भारत' ही संकल्पना पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय व्यवसायींसह प्रत्येकाचे योगदान आवश्यक असून आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांची मोठी जबाबदारी आहे. त्यादृष्टीने महिन्यातून एक दिवस मोफत आरोग्य तपासणी व उपचार उपलब्ध करून देण्याच्या 'जन सेहत सेतू' आरोग्य शिबीर कार्यक्रमात वैद्यकीय व्यवसायी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी केलं आहे. ते आज पुण्यातील विमाननगर इथल्या सिम्बॉयसिस ऑडिटोरियम इथं आयोजित केलेल्या 'जन सेहत सेतू' शिबीराचे उद्घाटन आणि पोर्टलच्या लोकार्पणप्रसंगी मांडविया बोलत होते. सर्वोत्तम मनुष्यबळ ही राष्ट्राची शक्ती असून शिबीरांबाबत जनजागृती करण्याचं आवाहन महापौर मंजुषा नागपुरे यांनी यावेळी केलं. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर,फोर्स वनचे अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. कृष्णप्रकाश, आरोग्य अधिकारी नीना बोराडे आदि यावेळी उपस्थित होते.
मुवैस-मसं-प्रशांत

राज्यात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत ४० हजार ७ शे ७६ रुग्णांना ३ शे ३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. हा निधी प्राप्त होण्याच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणांमुळे आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्यामुळे पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे. सातारा जिल्ह्यात विविध २० गंभीर आजारांसाठी १२ कोटी ९६ लाख २० हजार ५०० रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. गरजू रुग्णांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी १८-००-१२-३२-२११ या क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केलं आहे.

**माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव**

जिल्हा तसच गाव पातळीवर विकास कामांबरोबरच नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न करण्यासाठी 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी पूर्ण क्षमतेने झोकूण देऊन काम करण्याचं आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी "माझं गांव, आरोग्य संपन्न गाव" ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आवश्यक असलेल्या कृती आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**मुंडे**

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगारक्षम करुन त्यांना 'महाराष्ट्राचा आर्थिक कणा' करण्यावर भर आहे, ही योजना ग्रामीण पशुपालकांच्या आर्थिक तसंच सामाजिक विकासाचे एक सशक्त माध्यम ठरणार असल्याचं प्रतिपादन पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केलं आहे. त्या आज पुण्यात पशुसंवर्धन आयुक्तालयात 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' सादरीकरण आणि अमंलबजावणी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुदंडा उपस्थित होते.

**एसआयआर**

केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यात सुरू केलेल्या एसआयआर अर्थात मतदार यादी सखोल पुनर्नरीक्षण मोहिमेत पुण्यातील वडगाव शेरी मतदार संघातील 1 लाख 26 हजार मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. मतदार नोंदणी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, वडगाव शेरी मतदार संघात 5 लाख 24 हजार इतके मतदार आहेत. त्यातील 1 लाख 26 हजार मतदारांची त्यांच्या 2002 मधील मतदार यादीतल्या नावाशी जोडणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यातील येरवडा भागातून मतदारांचा प्रतिसाद सर्वसाधारण तर वडगाव शेरी, विमाननगर, लोहगाव, धानोरी, खराडी या परिसरातून मतदारांचा प्रतिसाद कमी आहे.

**आंदशा**

पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाची पुरंदर तालुक्यातील खानवडी येथील 'ज्योती सावित्री ही जिल्हा परिषदेची पहिली इंग्रजी माध्यमाची आणि केंद्रीय बोर्डावर आधारित ग्रामीण भागातील आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा उद्यापासून सुरु होत आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. महात्मा जोतिबा फुले यांच्या २००व्या जयंती वर्षाच्या प्रारंभदिनी हा सोहळा पार पडणार असल्याचे जगदाळे यांनी सांगितले. या शाळेत बालवाडी ते इयत्ता बारावीपर्यंत सीबीएसई अभ्यासक्रमावर आधारित शिक्षण दिले जाणार आहे.

**एफडीए**

अन्न आणि औषध प्रशासनाकडून मावळ तालुक्यात भेसळयुक्त आंबा पल्प तयार केल्या जात असलेल्या कारवाईत 2 लाख 23 हजार 196 रुपये किमतीचा साठा जप्त केला आहे.

**आयआयएमएस**

चौकटीबाहेरचा नाविन्यपूर्ण विचार करण्याची क्षमता आपल्याला उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जाते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते किंवा परीक्षेसाठी ज्ञानार्जन न करता त्याचा प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनात वापर करण्यासाठी प्रयत्नशील व्हायला हवेत असे आवाहन स्कोडा ऑटो वोक्सवॅगन इंडिया कंपनीचे रामहरी कुटे यांनी केलं आहे. ते आज पुण्यातील यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सतर्फे 'व्यवस्थापनातील नाविन्यता आणि माहिती तंत्रज्ञान' विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात कमाल तापमान 35 तर किमान तापमान 18 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही याच स्वरूपाचं तापमान राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**